# नाशिक महानगरपालिका नाशिक

## दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM)विभाग

## ई- निविदा नोटीस क्र. ०१ (२०१७-१८)

| | | |
|---|---|---|
| १ | **कामाचे नाव** | रोजगार मेळावा राबविण्यासाठी लागणाऱ्या उत्तम दर्जाच्या वस्तु व सेवा पुरविणेबाबत |
| २ | **कामाची मुदत** | १ दिवस |
| ३ | **काम करण्याचे ठिकाण** | दादासाहेब गायकवाड सभागृह, मुंबई नाका, नाशिक<br>दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ रोजी सकाळी १०.०० ते ६.०० या वेळेत |
| ४ | **मनपाच्या सकेंतस्थळावर कोरे फ्रॉर्म मिळण्याची अंतिम तारीख** | www.nashikcorporataion.in<br>दिनांक १९/०१/२०१८ ते २५ /०१/२०१८ दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ५ | **निविदा लिफाफा क्र.१ व २ जमा करण्याची अंतिम तारीख** | दिनांक २५ /०१/२०१८रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत मा. शहर प्रकल्प अधिकारी राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM) विभाग, १ ला मजला , राजीव गांधी भवन , शरणपूर रोड, नाशिक महानगरपालिका नाशिक येथे जमा करावे. |

**(अ) लिफाफा क्र.१ मध्ये सदर करावयाचे कागदपत्रे:**

(१) सेल टॅक्सप्रमाणपत्र , संस्था रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, कामाचा अनुभवाचा २ वर्षाचा दाखला, पॅनकार्ड, संस्थेचे बँक खाते इ. कागद पत्रे साक्षाकिंत करून जमा करणे आवशक राहील.

(२) कोटेशन बयाणारक्कम रु.५,०००/-(र.रु.पाच हजार फक्त )"आयुक्त नाशिक महानगरपालिका नाशिक" या नावाने असलेले पे ऑर्डर अथवा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट )सदर करणे बंधनकारक .

(३) संस्था/ फर्मचे नाव, मक्तेदाराचे नाव, कार्यालयीन व निवासाचा संपूर्ण पत्ता, दुरध्वनी मोबाईल क्रमांक सदर करणे आवश्यक आहे.

**(ब) लिफाफा क्र.२ मध्ये सदर करावयाचे तांत्रिक कागदपत्रे:**

(१) सिलबंद पाकिटात दिलेल्या नमुना नुसार देकार ऑफर सदर करणे बंधनकारक .

(२) निविदा धारकांनी देकार संच मुदतीत प्राप्त न झाल्यास त्याचे निविदा बाद करण्यात येईल.त्याची सर्वस्वी जवाबदारी मक्तेदाराची राहील .

(३) निविदा धारकांनी सर्व करासहित ( जि.एस.टी. चढाई,उतराई,हमाली व इतर कारसह )देकार भरणे आवश्यक आहे.नमुदकेलेल्या देकार व्यतिरिक्त कोणतेही ज्यादा कर अदा करता येणार नाही .

(४) सादर केलेले लिफाफा क्र.१व २ दिनांक २५ /०१/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजे नंतर शक्य झाल्यास शहर प्रकल्प अधिकारी(NULM) यांचे दालनात हजर असलेल्या मक्तेदारांच्या समक्ष उघडण्यात येतील.

(५) कोणतेही कारण न देता देकार ऑफर स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार मा.अतिरिक्त आयुक्त -२, नाशिक यांना राहतील .

**सर्व साधारण अटी-शर्ती:-**

(१) निविदा सोबतची कोटेशन धारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येईल.

(२) निविदा नोटीस मध्ये नमूद केलेली संख्या हि अंदाजे त्यामध्ये कमी जास्त होण्याची शक्यता आहे.

(३) निविदा दि. .१.२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजेला मा.शहरप्रकल्प अधिकारी( NULM) यांचे कार्यालयात उघडण्यात येतील.

(४) दिलेल्या मुदतीमध्ये मालाचा पुरवठा करणे/ काम करणे/ सेवा पुरविणे/ आवश्यक आहे.

(५) निविदा धारकास महानगरपालिकेचे लाभात र.रु १००/- चे स्टॅमपेपर वर करार नामा करून द्यावा लागेल. तसेच दोन सक्षम जमीनदार द्यावा लागेल .

(६) मुदतीत पुरवठा न केल्यास / सेवा न पुरविल्यास रु . ५०००/- दंड आकारला जाईल.व रक्कम निविदा धारकाकडून वसुलकेली जाईल .

(७) सदरचे मंजूर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी व निश्चित करण्यात आलेल्या स्थळी गरजेनुसार मालाचा पुरवठा करणे/ सेवा पुरविणे/ व्यवस्था करणे बंधनकारक राहील.

(८) मंजूर दर व स्पेसिफिकेशन प्रमाणे मालाचा पुरवठा न झाल्यास/ सेवा न पुरविल्यास/ काम न झाल्यास सदरचा माल परत करण्यात येईल/ नाकारण्यात येईल. त्याबाबतचा महापालिकेचा निर्णय अंतिम राहील.

(९) निविदा दर मंजूर झाले नंतर सदरच्या मालाच्या दरात/ कामाच्या दरात/ सेवेच्या दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास ज्यादा पैसै मिळणार नाही.

**Sd/-**

**अतिरिक्त् आयुक्त् – 2**

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**नाशिक महानगरपालिका नाशिक**

**दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान(DAY-NULM) विभाग**

**ई- निविदा नोटीस क्र. ०१ (२०१७-१८)**

## कामाचे नाव– रोजगार मेळावा आयोजित करण्यासाठी लागणाऱ्या उत्तम दर्जाच्या वस्तु व सेवा पुरविणेबाबत

दिनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगाराची उपलब्धता या उपांगाअंतर्गत रोजगार मेळावा मा.आयुक्त सो. यांच्या मान्यतेने मंगळवार दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ रोजी सकाळी १०.०० ते ६.०० या वेळेत दादासाहेब गायकवाड सभागृह, मुंबई नाका, नाशिक येथे आयोजित केले आहे. सदरचा रोजगार मेळावा नाशिक महानगरपालिका व जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नाशिक जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत असून रोजगार मेळाव्यामध्ये खाजगी उद्योजक, प्रशिक्षण देणा-या संस्था व प्लेसमेंट संस्था यांना समाविष्ट करणेत आलेले आहे.

सदर एक दिवसीय रोजगार मेळाव्यासाठी लाभार्थ्यांच्या मुलाखती घेण्याकरिता खालील प्रमाणे व्यवस्था, नाष्टा व जेवण व इतर उत्तम दर्जाच्या वस्तू व सेवा पुरविणेकामी मूळ उत्पादक, उत्पादनाचे अधिकृत वितरक, विक्रेते यांचेकडून व दर मागविण्यात येत आहे.

**देकार ऑफर**

| अ.क्र | तपशील | संख्या | प्रति नग दर | एकुण र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या संस्थांना लाभार्थींच्या मुलाखती घेण्याकरीता स्वतंत्र - दादासाहेब गायकवाड सभागृहच्या पार्किंगच्या जागेवर ८ फुट उंची ८x८ साईजचे स्वतंत्र कापडी पार्टीशन तयार करणे. | ४५ दालन | | |
| २ | स्वतंत्र कापडी पार्टीशन मध्ये एक ५x२ फुट साईजचे टेबल पुरविणे. | ५० नग | | |
| ३ | प्लास्टिकच्या खुर्च्या पुरविणे. | ३०० नग | | |
| ४ | उदघाटनप्रसंगी प्रमुख अतिथी व मान्यवरांना बसण्यासाठी स्टेजवर ५ x२ फुट साईजचे लाकडी टेबल, कापड व फ्रिलसह पुरविणे. | ३ नग | | |
| ५ | उदघाटनच्या ठिकाणी स्टेजवर २५x२० फुट साईजचे कापड पुरविणे. | १ नग | | |
| ६ | उदघाटनच्या ठिकाणी स्टेजवर पाठीमागच्या साईटला ३०x३० फुट साईजचे कारपेट पुरविणे. | १ नग | | |
| ७ | मनपाने दिलेल्या मसुद्याप्रमाणे डिजिटल होर्डींग्ज/ बॅनर बनविण्यासाठी प्रमाणबद्ध साईजमध्ये आकर्षक पद्धतीचे आर्टवर्क तयार करणे. | ७ बॅनर | | |
| ८ | डिजिटल प्रिंटिंगचे होर्डींग्ज/ बॅनर ५x८ साईजचे माहितीपत्रक बॅनर तयार करणे व नियोजित ठिकाणी लावणे. (मटेरियल, मजुरीसह व वाहतूक खर्चासह) | ४ बॅनर (१६० चौ.फुट) | | |
| ९ | डिजिटल प्रिंटिंगचे होर्डींग्ज/ बॅनर १०x१० साईजचे स्टेज स्वागत बॅनर तयार करणे व नियोजित ठिकाणी लावणे. (मटेरियल, मजुरीसह व वाहतूक खर्चासह) | २ बॅनर (२०० चौ.फुट) | | |
| १० | डिजिटल प्रिंटिंगचे होर्डींग्ज/ बॅनर ३x६ साईजचे स्वागत बॅनर तयार करणे व नियोजित ठिकाणी लावणे. (मटेरियल, मजुरीसह व वाहतूक खर्चासह) | १ बॅनर ( १८ चौ.फुट) | | |
| ११ | मुलाखत घेण्या-या उपस्थित संस्थां/कंपनी , जिल्हा कौशल्य विकास व रोजगार केंद्राचे अधिकारी व कर्मचारी व मनपा अधिकारी व कर्मचारी , सुरक्षा रक्षक, होमगार्ड यांना एक दिवसांसाठी सकाळी (एकदा) व सायंकाळी (एकदा) चहा पुरविणे. | ४०० नग | | |
| १२ | मुलाखत घेण्या-या उपस्थित संस्थां/कंपनी , जिल्हा कौशल्य विकास व रोजगार व मनपा अधिकारी व कर्मचारी, सुरक्षा रक्षक , होमगार्ड यांना सकाळी नाष्टात "समोसा" पुरविणे. | ३०० नग | | |

| अ.क्र | तपशील | संख्या | प्रति नग दर | एकुण र.रु. |
|---|---|---|---|---|
| १३ | मुलाखत घेण्या-या उपस्थित संस्थां/कंपनी, जिल्हा कौशल्य विकास व रोजगार केंद्राचे अधिकारी व कर्मचारी व मनपा अधिकारी व कर्मचारी, सुरक्षा रक्षक, होमगार्ड यांना दुपारचे जेवण पुरविणे. (व्हेजपुलाव - पार्सल पाकीट, व्हेजसलाड, पापड-१ नग आणि गुलाबजाम- दोन नग) | ३०० नग | | |
| १४ | मुलाखत घेण्या-या उपस्थित संस्थां/कंपनी, जिल्हा कौशल्य विकास व रोजगार केंद्राचे अधिकारी व कर्मचारी व मनपा अधिकारी व कर्मचारी, सुरक्षा रक्षक, होमगार्ड यांना एक दिवसांसाठी सकाळ दुपार व सायंकाळ अर्धा लिटर मिनरल पाण्याची बाटली पुरविणे. | ५०० नग | | |
| १५ | माईकसह साऊंड सिस्टीम व १ वायरलेस माईकसह पुरविणे, | १ नग | | |
| १६ | होलोजन लाईट्स | ६ नग | | |
| १७ | माहिती पत्रक (हॅन्डबिल) छापणे. (पुढील व मागिल बाजुला छपाई करणे) | ३,००० प्रती | | |
| १८ | इतर किरकोळ व आकस्मित खर्च | ३,००० /- र.रुपये | | |
| | एकुण | | | |

(अक्षरी र.रु.------------------------------------------------------------------------------------------------------------------)

देकार ऑफर मध्ये _अटी-शर्तीचे तसेच नियमांचे , मी वाचन _ केले असुन ते मला मान्य असल्याने वरील प्रमाणे सर्व करासहित देकार ऑफरदर सादर केला आहे.

**ठिकाण :-**

**दिनांक :-**

**कोटेशन धारकाची सही व शिक्का**